ePaper
लाडकी बहीण योजनेचे निकष बदलणार?: अजित पवार
वर्ष - 8 । अंक -143 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- लबूशेनला इलेव्हनमधून बाहेर करा
- पाकिस्तानने इंडियाला केलं चीतपट
- दिल्लीत अरविंद केजरीवालांवर हल्ला!
- बांगलादेशी रुग्णांवर उपचार करणार नाही

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 01 डिसेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### महायुतीमध्ये सरकार स्थापण्याबाबतची चर्चा थंडावली

# शपथविधी गुरुवारी!



## आझाद मैदानावरील सोहळ्याला पंतप्रधानांसह ज्येष्ठ नेत्यांची उपस्थिती

। मुंबई । महाईन्यूज

**महायुतीमध्ये सरकार स्थापण्याबाबतची चर्चा थंडावली असली तरी येत्या गुरुवारी म्हणजे ५ डिसेंबरला नवीन सरकारचा शपथविधी पार पडेल, असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी जाहीर केले. खातेवाटप आणि मंत्र्यांची संख्या यावर तिन्ही घटक पक्षांच्या नेत्यांमध्ये सोमवारनंतरच चर्चा केली जाणार आहे. भाजपकडून काही नवीन चेहऱ्यांना मंत्रिमंडळात संधी दिली जाण्याची चिन्हे आहेत.**



देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील शपथविधीचा मुहूर्त अखेर ठरला असून ५ डिसेंबरला सायंकाळी पाच वाजता मुंबईत आझाद मैदानात शपथविधी समारंभ होणार आहे. नवे सरकार देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली स्थापन होणार असून भाजप पक्षश्रेष्ठींनी त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, भाजप अध्यक्ष नड्डा,केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री, एनडीएतील घटक पक्षांचे नेते, संत, महंत व धर्मगुरू हे शपथविधी समारंभास उपस्थित राहतील. फडणवीस यांच्या नावावर पक्षश्रेष्ठींनी शिक्कामोर्तब केल्याने भाजप विधिमंडळ पक्षाची नेतानिवडीची बैठक ३ किंवा ४ डिसेंबरला विधान भवनात घेण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे राज्यभरातून येणाऱ्या आमदारांना बैठक व शपथविधी समारंभास हजर राहणे सोयीचे होईल. बावनकुळे यांनी शपथविधी समारंभास राज्यभरातील कार्यकर्त्यांना मुंबईत येण्याच्या आणि त्यादिवशी राज्यभरात जल्लोष करण्याच्या सूचना दिल्या आहेत. या समारंभाच्या व जल्लोषाच्या तयारीसाठी त्यांनी आमदार व पदाधिकाऱ्यांची बैठकही घेतली. भाजपने राज्यभरातून सुमारे १५ हजार कार्यकर्त्यांना येण्यासाठी नियोजन केले आहे.

### पहिल्या टप्प्यात 25 ते 27 मंत्री?

पहिल्या टप्प्यात २५-२७ मंत्र्यांचा समावेश होण्याची शक्यता आहे. या मंत्रिमंडळात भाजपला २०, शिवसेनेला ( एकनाथ शिंदे ) १३ व राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार) ९ मंत्रीपदे असे सूत्र निश्चित झाल्याचे समजते. मंत्रिमंडळात काही जागा रिक्त ठेवल्या जाणार असून पहिल्या टप्प्यात प्रत्येकी आठ-नऊ मंत्र्यांचा शपथविधी होण्याची शक्यता आहे. भाजपकडून काही नवीन व तरुण चेहऱ्यांना संधी दिली जाणार असून सत्तरी गाठलेल्या नेत्यांना संधी मिळणे अवघड आहे. मुंबईतून दोन-तीन नेत्यांना मंत्रीपदाची संधी मिळण्याची शक्यता आहे.

### चर्चा थंडावली

सरकार स्थापण्याबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे गुरुवारी मध्यरात्री झालेल्या बैठकीनंतर पुढील रणनीती ठरविण्यासाठी मुंबईत चर्चा करण्यात येईल.

पण शुक्रवारी काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सातारा जिल्ह्यातील त्यांच्या गावी रवाना झाले. ते रविवारी मुंबईत परतण्याची शक्यता आहे.

शनिवारी देवेंद्र फडणवीस व अजित पवार हे दोघेही मुंबईबाहेरच होते. यामुळे पुढील चर्चा अजून झालेली नाही. मंत्र्यांची संख्या आणि खातेवाटप यावर सोमवारनंतरच चर्चा होईल, असे समजते.

### गृहमंत्रिपद कोणाला मिळणार?

समोर आलेल्या माहितीनुसार एकनाथ शिंदे हे गृहमंत्रिपदासाठी अग्रही आहेत. गृहमंत्रिपद मिळालं तरच उपमुख्यमंत्रिपद स्विकारणार अशी त्यांची भूमिका आहे. गृहमंत्रिपद शिवसेनेला न मिळाल्यास उपमुख्यमंत्रिपद हे शिवसेनेचा एखादा दुसरा ज्येष्ठ नेता स्विकारण्याची शक्यता आहे. गृहमंत्रिपदासोबतच मुख्यमंत्रिपदाबाबत देखील सस्पेन्स कायम आहे. नव्या मुख्यमंत्र्यांच्या नावाची घोषणा अद्याप करण्यात आलेली नाही. मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीमध्ये देवेंद्र फडणवीस यांचं नाव आघाडीवर आहे. दुसरीकडे शपथविधी सोहळ्याची तारीख निश्चित करण्यात आली आहे.

### 'अर्थमंत्रिपद माझ्याकडेच', अजित पवार

'राज्यात नवे सरकार स्थापन होईल,' असे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी गुरुवारी दिल्ली येथे स्पष्ट केले. त्याच वेळी 'आगामी सरकारमध्ये अर्थमंत्रिपद आपल्याकडेच येईल व सर्वाधिक वेळा राज्याचा अर्थसंकल्प मांडण्याचा विक्रम माझ्या नावावर जमा होईल,' असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत गुरुवारी महायुतीच्या प्रमुख नेत्यांची बैठक असल्याने पवार दिल्लीत आले होते. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या निवासस्थानी पत्रकारांशी संवाद साधताना महाराष्ट्रातील सत्तास्थापनेबाबत भूमिका मांडली.

### गृहखाते आम्ही उत्तम सांभाळू! संजय शिरसाट

राज्याच्या नव्या सरकारच्या शपथविधी सोहळ्याची उत्सुकता असतानाच शिवसेनेचे आमदार संजय शिरसाट यांच्या विधानाने राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साताऱ्यातील त्यांच्या दरे गावी गेले असून, मोठा निर्णय घेण्यासाठीच ते त्यांच्या दरे गावी जातात, असे वक्तव्य संजय शिरसाट यांनी शनिवारी केले. तर शिवसेनेकडे गृहखाते दिल्यास आम्ही उत्तम संभाळू शकतो, असा विश्वास त्यांनी या वेळी व्यक्त केला. अजूनही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे काळजीवाहू मुख्यमंत्री आहेत, सरकार वाऱ्यावर सोडलेले नाही. सोमवारी भाजपचे निरीक्षक येणार आहेत, असे समजते.

# निवडणूक काळात आर्थिक गैरव्यवहार

## अजित पवारांनी देखील बाबा आढाव यांची भेट घेतली

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये झालेल्या ईव्हीएम घोटाळ्यावरून आत्मक्लेष उपोषण सुरू केलं होतं. पुण्यात तीन दिवस हे उपोषण केल्यानंतर आज (३० नोव्हेंबर) शिवसेनेचे (ठाकरे) प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते पाणी पिऊन बाबा आढाव यांनी त्यांचं उपोषण सोडवलं.**



‘लाडकी बहीण’सारख्या योजना, पैशांचा पाऊस, ईव्हीएमवरून व्यक्त केला जाणारा संशय अशा विविध मुद्द्यांवरून त्यांनी सरकारला जाब विचारत तीन दिवस उपोषण केलं. बाबा आढाव हे ९५ वर्षांचे आहेत. दरम्यान, उद्धव ठाकरे यांनी उपोषण सोडवण्यापूर्वी माजी उपमुख्यमंत्री अजित पवारांनी देखील बाबा आढाव यांची भेट घेतली होती.बाबा आढाव यांच्या भेटीनंतर अजित पवार म्हणाले, “निवडणुकीत पैशांचा गैरवापर झाल्याचा आरोप बाबा आढाव करत आहेत. परंतु, राज्यात तशी स्थिती कुठेही आढळली नाही. इतर राज्यात बूथ कॅप्चरिंगसारखे (मतदान केंद्र ताब्यात घेणे) प्रकार घडतात. महाराष्ट्रात अशी घटना कुठे घडली नाही. ते म्हणतायत की प्रलोभन दाखवून मतं मिळवली. परंतु, आम्ही तसं केलेलं नाही. लोकसभा निवडणुकीत आमचा दारुण पराभव झाल्यानंतर आम्ही बघितलं की लोकांना काय हवं आहे? मी स्वतः राज्याचा अर्थमंत्री होतो. मी आमच्या अर्थ विभागातील अधिकाऱ्यांना घेऊन बसलो. लोकांना लाभ कसा देता येईल आणि त्याचे राज्यात काय परिणाम होतात हे आम्हाला पाहायचं होतं. गरिबांना थेट लाभ द्यावा, असं आमच्या डोक्यात होतं. त्यावेळी माझं साडेसहा लाख कोटी रुपयांचं बजेट (अर्थसंकल्प) तयार होतं. त्यातून मी म्हटलं आपण ७५ हजार कोटी रुपये बाजूला काढू. त्यापैकी ४५ हजार कोटी लाडकी बहीण योजनेला देऊ. १५,००० कोटी वीज माफीसाठी आणि इतर पैसे तीन गॅस सिलेंडर मोफत देणे व इतर योजनांसाठी राखून ठेवले. तेवढा भार राज्याला उचलावा लागेल असा आमचा विचार होता. अर्थ विभागाने देखील त्यास हिरवा कंदील दाखवला”.अजित पवार म्हणाले, “अर्थ विभागाने आणखी एक गोष्ट सुचवली की आपण १० टक्के बचत केली तर ६५ हजार कोटी रुपये वाचवू शकतो. मला कठोर निर्णय घ्यायची सवयच आहे. त्यानुसार आम्ही काही कठोर निर्णय घेतले आणि ७५ हजार कोटी रुपये बाजूला काढून जनतेला थेट लाभ देण्यासाठी वापरले. राज्याचा कारभार करत असताना ते पैसे लोकांसाठीच वापरले”. माजी उपमुख्यमंत्री म्हणाले,“यापूर्वी काँग्रेसने संजय गांधी निराधार योजना आणली होती. तत्कालीन मुख्यमंत्री ए. आर. अंतुले यांनी ६० रुपये देण्यास सुरुवात केली होती. आम्ही १५०० रुपये केले. निराधारांसाठीची ती योजना आजही चालू आहे. आम्ही काही लोकांशी बोललो. वेगवेगळ्या राज्यांमध्ये कोणत्या योजना लोकप्रिय आहेत ते जाणून घेण्याचा प्रयत्न केला. शिवराज सिंह चौहान आम्हाला म्हणाले की माझ्या राज्यात ‘लाडली बहन’ योजना लोकप्रिय आहे. ते १७ वर्षे मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री राहिले आहेत. आता ते केंद्रात कृषीमंत्री आहेत. कर्नाटकमध्ये देखील काँग्रेसवाल्यांनी अशीच योजना आणली. फुकट एसटी प्रवास दिला. तसेच आता निवडणुकीच्या जाहीरनाम्यात महाविकास आघाडीने महिलांना तीन हजार रुपये देण्याची घोषणा केली होती. मग ते प्रलोभन नव्हतं का? पदवीधरांना चार हजार रुपये देऊ असं त्यांनी म्हटलं होतं, मग ते प्रलोभन नव्हतं का? तीन लाखांपर्यंतची कर्जमाफी देण्याची घोषणा केली होती. आम्ही २ लाख रुपयांची कर्जमाफी दिली होती. महाविकास आघाडीने जी प्रलोभनं दिली. त्यासाठी तीन लाख कोटी लागणार होते.

### निवडणुकीत पैशांचा गैरवापर

उपोषण सोडवण्यापूर्वी माजी उपमुख्यमंत्री अजित पवारांनी देखील बाबा आढाव यांची भेट घेतली होती.बाबा आढाव यांच्या भेटीनंतर अजित पवार म्हणाले, “निवडणुकीत पैशांचा गैरवापर झाल्याचा आरोप बाबा आढाव करत आहेत. परंतु, राज्यात तशी स्थिती कुठेही आढळली नाही. इतर राज्यात बूथ कॅप्चरिंगसारखे (मतदान केंद्र ताब्यात घेणे) प्रकार घडतात.

# महाराष्ट्रामध्ये ५० टक्के पाण्याची कमतरता

## आत्महत्या रोखण्यासाठी पाण्याच्या प्रश्नाची सोडवणूक गरजेची

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्रामध्ये ५० टक्के पाण्याची कमतरता आहे. जलसंधारण ही एकमेव गोष्ट अवर्षणग्रस्त राज्याचा प्रश्न सोडवू शकते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी पाण्याच्या प्रश्नाची सोडवणूक करणे गरजेचे आहे, असे मत माजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी व्यक्त केले.**



भारतीय जैन संघटनेच्या राष्ट्रीय अधिवेशनामध्ये फडणवीस बोलत होते. प्रसिद्ध अभिनेते आणि पानी फाउंडेशनचे विश्वस्त आमिर खान, सत्यजित भटकळ, आमदार चंद्रकांत पाटील, माधुरी मिसाळ, भीमराव तापकीर, सुनील कांबळे, योगेश टिळेकर, हेमंत रासने, प्रशांत बंब, परिणय फुके, भारतीय जैन संघटनेचे संस्थापक शांतिलाल मुथा या वेळी उपस्थित होते.फडणवीस म्हणाले, ‘२०२० मध्ये केंद्र सरकारने एक पाणी सारणी अहवाल केला होता. त्यामध्ये देशाच्या सर्व राज्यांतील पाण्याची पातळी खाली गेली होती. महाराष्ट्र हे एकमेव असे राज्य होते ज्यामध्ये पाण्याची पातळी वाढलेली होती. जलसंधारण क्षेत्रात पानी फाउंडेशन आणि भारतीय जैन संघटना चांगले काम करत आहेत.‘आप आगे बढो, हम तुम्हारे साथ है’, असे म्हणत मी कार्यकर्ता म्हणून तुमच्याबरोबर आहे.’तर भारताच्या ‘जीडीपी’चा (सकल राष्ट्रीय उत्पादनाचा)आहे. देशाला आर्थिक महासत्ता करण्याचा रस्ता जैन समाजाच्या मार्गानेच जातो. जैन समाज दातृत्वामध्ये अग्रणी आहे. निःस्वार्थ सेवा हा गुण आहे. केवळ सरकार सारे काही करू शकणार नाही हे ध्यानात घेऊन भारतीय जैन संघटना आणि पानी फाउंडेशनने जलसंधारणामध्ये काम केले आहे. मानवी बुद्धिमत्तेचा वापर आपण करणार नसू तर, कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग होणार नाही. सज्जनशक्तीच्या पाठीशी राहणे हे कर्तव्यच नाही तर जबाबदारी आहे, या भावनेतून कार्यक्रमाला उपस्थित असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

### जैन संघटना चांगले काम करत आहेत

प्रसिद्ध अभिनेते आणि पानी फाउंडेशनचे विश्वस्त आमिर खान, सत्यजित भटकळ, आमदार चंद्रकांत पाटील, माधुरी मिसाळ, भीमराव तापकीर, सुनील कांबळे, योगेश टिळेकर, हेमंत रासने, प्रशांत बंब, परिणय फुके,फडणवीस म्हणाले, ‘२०२० मध्ये केंद्र सरकारने एक पाणी सारणी अहवाल केला होता. त्यामध्ये देशाच्या सर्व राज्यांतील पाण्याची पातळी खाली गेली होती. महाराष्ट्र हे एकमेव असे राज्य होते ज्यामध्ये पाण्याची पातळी वाढलेली होती. जलसंधारण क्षेत्रात पानी फाउंडेशन आणि भारतीय जैन संघटना चांगले काम करत आहेत.

## नोटीस देऊनही बांधकामे सुरू

# पीएमआरडीए ॲक्शन मोडवर!

### आचारसंहिता संपताच अनधिकृत बांधकाम धारकांवर थेट कारवाई

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता संपताच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) ॲक्शन मोडवर आले आहे. अनधिकृत बांधकाम काढून घेण्याबाबत नोटीस दिल्यानंतरही बांधकाम सुरू ठेवल्याप्रकरणी गहूंजे येथील दोघांवर थेट गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.**




इंदाराम चौधरी (रा. गहूंजे, ता. मावळ), दीपक कुमार सहानी (रा. गहूंजे, ता. मावळ) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीएचे) कनिष्ठ अभियंता गणेश जाधव यांनी तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, इंदाराम चौधरी यांना पीएमआरडीएने अनधिकृत बांधकाम काढून घेण्याबाबत नोटीस दिली होती. तिचे पालन न करता चौधरी यांनी चार मजली इमारतीचे अनधिकृत बांधकाम केले. याबाबत त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दीपक कुमार सहानी यांना देखील पीएमआरडीएने अनधिकृत बांधकाम काढून घेण्याबाबत नोटीस दिली होती. तिचे पालन न करता सहानी यांनी चार मजली इमारतीचे अनधिकृत बांधकाम केले.

याबाबत त्यांच्या विरोधात देखील गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही गुन्ह्यांचा तपास तळेगाव दाभाडे पोलीस करीत आहेत.

### बांधकाम काढून घेण्याबाबत नोटिसा

दरम्यान, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहिता कालावधीत पीएमआरडीए हद्दीत मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे झाल्याचे दिसून येत आहे. आचारसंहिता संपताच प्रशासनाने या बांधकामांवर कारवाईचा हातोडा उगारण्यास सुरुवात केली आहे. अनधिकृत बांधकाम धारकांना बांधकाम काढून घेण्याबाबत नोटिसा दिल्या जात आहेत. त्यानंतरही बांधकाम सुरू ठेवल्यास गुन्हे दाखल केले जात आहेत.

---

## पिंपरी-चिंचवडकरांचा मार्ग खडतर!

### पावसाळा संपून दोन महिने झाल्यानंतरही करावा लागतोय खड्ड्यातूनच प्रवास

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पावसाळ्यात शहराच्या विविध भागांत ६२४६ खड्डे पडले होते.यंदा सर्वाधिक खड्डे असल्याची कबुलीही महापालिका प्रशासनाने दिली होती. पावसाळा संपून दोन महिने झाल्यानंतरही पिंपरी-चिंचवडकरांना खड्डयातूनच प्रवास करावा लागत आहे. शहराच्या विविध भागांतील रस्त्यांवर ३०६ खड्डे अद्यापही आहेत. आतापर्यंत ५९४० खड्डे बुजविल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे. शहरात यंदा जूनअखेर पावसाला सुरुवात झाली होती. जून, जुलै आणि ऑगस्टच्या पहिल्या पंधरवड्यात जोरदार पाऊस झाला. त्यामुळे शहरातील रस्त्यांची चाळण झाली होती. पावसाळ्यात शहराच्या विविध भागांत ६२४६ खड्डे पडले होते.**



यंदा सर्वाधिक खड्डे असल्याची कबुलीही महापालिका प्रशासनाने दिली होती. मात्र, अद्यापही शहरातील भोसरी एमआयडीसी, चिखली, जाधववाडी, देहू रस्ता, चिंचवड, निगडीसह काही भागांतील रस्त्यावर खड्डे आहेत. खड्ड्यांतून सुट्या झालेल्या खडीमुळे दुचाकी घसरून अपघात होत आहेत. खड्ड्यांपासून बचावासाठी वाहनचालकांना कसरत करावी लागत आहे. परिणामी, वाहतुकीला संथ गती येत आहे. कोंडीत भर पडत आहे.

महापालिकेने डांबर आणि कोल्ड मिक्सने २८५४, खडीने ४२८, पेव्हिंग ब्लॉकने २०६३, सिमेंट काँक्रिटने ५७८ असे ५९४० खड्डे पूर्ण बुजविले आहेत. शहराच्या विविध भागांतील ३०६ खड्डे बुजवायचे बाकी असल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे.

### कंत्राटदार, अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित

शहरात दोन हजार किलोमीटर अंतराचे रस्ते आहेत. रस्ते तयार करण्यात आल्यावर वर्षभरात खड्डे पडल्यास कंत्राटदार, उपअभियंता आणि कनिष्ठ अभियंता यांच्यावर जबाबदारी निश्चित केली जाणार आहे. पावसाळ्यात रस्त्यावर खड्डे पडताच तत्काळ मुरूम, खडी आणि सिमेंट काँक्रिटने बुजविले जातात. आता पावसाळा संपला असून सर्व खड्डे पुन्हा नव्याने डांबराने भरण्यात येणार आहेत. यासाठी अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेण्यात येईल. त्यानंतर शहर खड्डेमुक्त करण्यासाठी अधिकाऱ्यांना मुदत दिली जाईल, असे पिंपरी-चिंचवड महापालिकेचे शहर अभियंता मकरंद निकम यांनी सांगितले.



## भूमिका

# “लाडकी बहीण” उपयोगी आली अन्...

**“लाडकी बहीण” योजनेमुळे महायुती जिंकली, असे आता बहुतेक सर्वांचे मत झाले आहे. राज्य सरकारच्या आणि केंद्र सरकारच्या इतर रोखीच्या आणि सवलतीच्या योजना सोबतीला असल्याने लाडकी बहिण योजना आत्यंतिक प्रभावी ठरल्याचे दिसून येते.**

शेतीच्या दुरावस्थेमुळे बेरोजगार झालेल्या आणि महागाईने त्रस्त झालेल्या गरीबवर्गाला या योजनांमुळे मोठा दिलासा मिळालेला आहे. या योजनांमुळे फक्त बहिणीच खुश झाल्या नसून त्यांची अख्खी कुटुंबे युतीला अनुकूल झाली. युती निवडून आली नाही तर पुढे काय, याची या लोकांच्या मनात भीती निर्माण करण्यात युतीची प्रचार यंत्रणा यशस्वी झाली. या योजनेमुळे सर्व गरीब लोक जात, धर्म विसरून युतीच्या मागे एकवटले असल्याचे दिसून आले. शेतजमिनीच्या वाढत्या तुकडेकरणामुळे अल्पभूधारक आणि भूमिहीन शेतकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या वर्गावर शेतमालाच्या घसरलेल्या दरांचा काही प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता नव्हतीच. त्यामुळे युतीला जिंकविण्यासाठी हे मतदार मतदानासाठी मोठ्या प्रमाणात घराबाहेर पडले. मला वाटते, यावेळी मतदान वाढण्यामागे हे एक महत्त्वाचे कारण असण्याची शक्यता



आहे. असे असले तरी या रेवड्या वाटण्याच्या योजनेमुळे राज्यात अत्यंत घातक पायंडा पडलेला आहे. आता सरकारी योजनेद्वारे मतदारांना अधिकृतरित्या पैशाचे आमिष दाखविण्याचा मार्ग खुला झाला आहे, असे वाटते. ‘लाडकी बहीण’सारख्या योजना राज्याच्या आर्थिक व्यवस्थेपुढे संकटे निर्माण करण्याची शक्यता आहे. आधीच आर्थिक तुटीमुळे बेजार झालेल्या सरकारचा फार मोठा निधी या योजनेत खर्च होत आहे. त्यामुळे सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, रस्ते, पाणी व वीज पुरवठा, या सारख्या सामाजिक कल्याणाच्या योजनांवर खर्च करायला सरकारजवळ पैसा राहणार नाही. मग दारूवर कर वाढविणे, पेट्रोल डिझेलवर सरचार्ज लावणे, स्टॅम्प ड्यूटी वाढविणे, कर्ज काढणे यासारखे उपाय योजले जाऊ शकतात. पेट्रोल डिझेलवरील सरचार्जमुळे महागाईत वाढ होईल. दारूवरील कर वाढविण्यासाठी दरवाढीसोबतच अधिकचे परवाने दिले जातील. त्यामुळे राज्यात दारूचा महापूर वाहिला तर नवल वाटायला नको. अशा फुकट्या योजनांमुळे एकंदर आर्थिक बेशिस्त होईल, हे सांगण्यासाठी भविष्यवेत्त्याची गरज नाही. आर्थिक बेशिस्तीमुळे खासगीकरणाला उत्तेजन देण्यात येईल. या योजनांच्या माध्यमातून लोकांना थेट पैशाचा पुरवठा होत असला तरी तो वाढत्या महागाईला पुरे पडणार नाही. अर्थात जनतेच्या जेव्हा लक्षात येईल, तेव्हा त्याला उशीर झाला असेल. या फुकट्या योजनांमुळे लोकांमध्ये आधीच शैथिल्य निर्माण होत आहे. रोखीच्या आणि सवलतींच्या योजनांमुळे लोकांचे जगणे थोडे सुकर होत असल्याने त्यांच्यातील विकासाच्या आकांक्षा खुरटल्या जात आहेत. दुसऱ्या बाजूला, या योजनांमुळे शेतीत काम करायला मजूर मिळत नाहीत. गावागावातील शेतकऱ्यांना विचारले, तर ते त्यांची ही व्यथा आपल्याला नक्की ऐकवतील. शेतमालाच्या भावाची वरचेवर पडझड होत असल्याने शेतकऱ्यांकडे पुरेसे भांडवलही जमा होत नाही. या फुकट्या योजनांसोबत मतदारांना काळ्या पैशाच्या विक्रमी महापुरात न्हाऊन टाकले गेलेले आहे. पूर्वीही बहुतेक सर्वच पक्षांकडून पैसे वाटले जात होतेच. परंतु यात यावेळी झालेली वाढ अभूतपूर्व अशीच होती. या वाढीव रकमांनी वाटल्या जाणाऱ्या पैशाचे नवीनच मानदंड प्रस्थापित केलेले आहेत. यापुढे प्रत्येक उमेदवारांकडून लोक एवढ्याच किंवा अधिक पैशाची अपेक्षा करायला लागतील. राज्यातील जनतेच्या भविष्याच्या दृष्टीने हे अत्यंत घातक ठरणार आहे. एवढे पैसे कुठून येतात, याचा विचार मतदार जरी करीत नसले, तरी त्याचे परिणाम भविष्यकाळात त्यांनाच भोगावे लागणार आहेत. परंतु आज तरी लोकांना याचे भान राहिले आहे, असे वाटत नाही. परंतु पैशाचा हा महापूर संवेदनशील आणि जागरूक नागरिकांमध्ये भय निर्माण केल्याशिवाय राहत नाही. या रेवड्या कशाबशा चालू ठेवल्या तरी राजकारण्यांना स्वतःसाठी, तसेच निवडणुकीच्या काळात खर्चासाठी आणि वाटण्यासाठी पैसा हवा असतोच.

## प्रासंगिक »

### दोडकी व्हा...


***बहिणी आहेतच एवढ्या लाडक्या तर त्यांनी आपल्या बरोबरीने विधिमंडळात बसावे असे भाऊरायांना कधीही का वाटत नाही?***

थोरली असो वा धाकटी, बहीण असतेच भावाची लाडकी. तो दरवर्षी तिच्याकडून राखी बांधून घेतो, भाऊबीजेला ओवाळून घेतो, प्रेमाने तिला हव्या त्या भेटवस्तू देतो. लग्न झाल्यानंतर वर्षातून एक-दोन वेळा तिचे हक्काचे माहेरपण करतो. पण त्याच लाडक्या बहिणीने वडिलांच्या संपत्तीत आपला कायदेशीर वाटा मागितला की मग मात्र भाऊरायांचे पित्त खवळते. तिला तो वाटा मिळत तर नाहीच, वर तिचे माहेरही तुटते. मी देईन त्या भेटवस्तूंच्या तुकड्यांवर समाधान मानशील, तरच तू माझी लाडकी असेच या भाऊरायांचे साधारणपणे म्हणणे असते. पिंडी ते ब्रह्मांडी या न्यायाने घरातला भाऊ जसा वागतो तसाच सत्तेतला भाऊही वागतो. यंदा तर त्याने लाडक्या बहिणींना दरमहा १५०० रुपये देण्याचे जाहीर केले. तसे ते दिलेही. वर निवडणुकीनंतर ते २१०० रुपये करण्याचे आश्वासनही दिले.

अर्थशास्त्रातील ताज्या नोबेल पारितोषिक विजेत्यांच्या कामाचा निष्कर्ष असा आहे की, देशाला प्रगती करण्यासाठी सर्वसमावेशक संस्था वाढवणे आवश्यक आहे. आयआयटीसाठी संयुक्त प्रवेश परीक्षा (जेईई) आत्ता ज्या पद्धतीने घेतली जाते, ती सर्वसमावेशक नाही.

# सध्याच्या ‘जेईई’ऐवजी काय हवे?

इच्छुक विद्यार्थी जेईईसाठी अनेक वर्षे अभ्यास करतात, त्यासाठी बहुतेक वेळा ते आयुष्यातल्या सगळ्या महत्त्वाच्या गोष्टी बाजूला ठेवून देतात. यातच त्यांची सगळी उमेदीची वर्षे संपून जातात. परीक्षा देणाऱ्या एकूण विद्यार्थ्यांपैकी फक्त दोन टक्केच विद्यार्थी उत्तीर्ण होतात हे पाहता जेईई ही जवळपास लॉटरी आहे. पण जेईईच्या गुणवत्तेवर परिणाम न करता ही परीक्षा आणखी समावेशक करणे शक्य आहे.अनेक अभ्यासांतून असे दिसून आले आहे की कोचिंग क्लासमुळे जेईईच्या यशाची शक्यता वाढते. पण त्यासाठी कोचिंग क्लासच्या भरमसाट फिया भराव्या लागतात. निम्न आर्थिक स्तरातील अनेक जण आपल्या मुलांना कोचिंग क्लासमध्ये घालण्यासाठी त्यांच्या आर्थिक क्षमतेपेक्षा जास्त खर्च करतात. कोचिंग क्लासला घातल्यानंतर जेईई उत्तीर्ण होण्याच्या शक्यता जास्त असल्या तरी, या परीक्षेत निश्चित यश मिळेल याची शाश्वती नसते. आपण ही परीक्षा उत्तीर्ण होऊ शकणार नाही, असे



ज्या मुलांना वाटते, त्यांच्या मनामध्ये अपराधी भावना निर्माण होऊ शकते. कधीकधी तर या भावनेतून टोकाला जाऊन आत्महत्या देखील होऊ शकतात. मी या लेखाच्या माध्यमातून मांडत आहे, तो प्रस्ताव कोचिंग क्लासेसना मुख्य प्रवाहात सामील करून घेऊन या प्रश्नावर उपाय सुचवणारा आहे.अखिल भारतीय उच्च शिक्षण २०२१-२२ च्या सर्वेक्षणानुसार, अभियांत्रिकीचे शिक्षण घेतलेल्या ३९ लाख विद्यार्थ्यांमध्ये मुलींचे प्रमाण २९ टक्के होते. जेईईसाठी अर्ज करणाऱ्यांमध्ये मुली ३० टक्के आहेत. दुर्दैवाने, त्यांच्यासाठी २० टक्के राखीव जागा लागू होईपर्यंत आयआयटीमध्ये १० टक्क्यांहूनही कमी मुलींना प्रवेश मिळत असे. जेईई पास होण्यासाठी बरीच गुंतवणूक करावी लागते आणि आपल्या समाजात शिक्षणामधली ही गुंतवणूक मुलींसाठी केली जात नाही हे लक्षात घेता, मुलींना या प्रक्रियेत प्रवेश मिळण्यासाठी राखीव जागा हा एकमेव मार्ग आहे. अर्थात ती काही उत्तम पद्धत नाही.जेईईसाठी केलेला अभ्यास नंतर उपयोगी पडला असता तर परिस्थिती इतकी बिघडली नसती. पण तसे होत नाही. उदाहरणार्थ, अभियंता बनू इच्छिणाऱ्या प्रत्येकासाठी त्रिकोणमितीचा अभ्यास (ट्रिग्नॉमेट्री) उपयुक्त असला तरी, त्रिकोणमितीतील ‘प्रॉब्लेम्स’ सोडवण्याचे वेगवेगळे हजारो मार्ग कोणाच्याही उपयोगाचे नाहीत. शाळेत चांगले गुण मिळवलेले आणि जेईईसाठी भरपूर मेहनत घेतलेले बहुतेक अभियांत्रिकी पदवीधर आज बेरोजगार आहेत. या लेखात सुचवल्याप्रमाणे जेईईची तयारी केली तर ते बेरोजगार राहणार नाहीत. कारण एखाद्याला आवडलेल्या शाखेचा/विषयाचा अभ्यास करता न येणे आणि दुसरेच काही करावे लागणे ही दुसरी गंभीर समस्या आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ईव्हीएममुळे लोकशाही संपुष्टात येतेय!

## महादेव जानकर : राष्ट्रवादी, सेनेप्रमाणे तुमच्याही पक्षावर तो दावा ठोकू शकतो का?



### हा विजय नसून सूज आहे

राष्ट्रीय समाज पक्ष ईव्हीएमच्या विरोधात देशभर आंदोलन करणार आहे. विरोधक जर या आंदोलनात सामील होणार असेल तर त्यांचेही आम्ही स्वागत करू.ईव्हीएम हॅक होऊ शकते का? या प्रश्नावर बोलताना महादेव जानकर यांनी आपल्या इंग्रजी बोलण्याच्या शैलीत या विषयावर भाष्य केले. "ईव्हीएम हॅक होते. आय एम अल्सो द इंजिनिअर. आय नो दॅट. विमान हॅक करता येते, सर्व काही हॅक करता येते. लोकशाही जिवंत ठेवायचे असेल तर त्यांनी मतपत्रिकेवर निवडणूक घ्यावी. आम्ही त्यांचे स्वागत करू." जानकर पुढे म्हणाले, सर्वोच्च न्यायालय, सर्व यंत्रणा, निवडणूक आयोग, माध्यमे अशा लोकशाहीच्या चारही स्तंभावर आज त्यांचे नियंत्रण आहे. त्यामुळे याला लोकशाही म्हणताच येणार नाही.

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**एकेकाळी महायुतीच्या सरकारमध्ये मंत्रीपद भूषविणारे आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत महायुतीतर्फे परभणी लोकसभेची निवडणूक लढविणारे महादेव जानकर आता भाजपावर टीका करत आहेत. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी राष्ट्रीय समाज पक्षाचे अनेक उमेदवार उभे केले होते. मात्र त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. महायुतीचा पाठिंबा असलेली फक्त एक जागा निवडून आली. विधानसभा निवडणुकीच्या निकालावर बोलताना ते म्हणाले की, मी एकटाच लढत आहे. मी देशभर फिरून पक्ष संघटन वाढविणार आहे. कारण भाजपाच फार वाईट अनुभव आलेला आहे आणि काँग्रेसचा अनुभव मला चाखायचा नाही. विशेष म्हणजे लोकसभा निवडणुकीत महादेव जानकर यांच्यासाठी खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रचार सभा घेतली होती.**

विधानसभा निवडणुकीच्या निकालावर बोलताना महादेव जानकर म्हणाले, "महायुतीसाठी निकाल चांगला लागला असला तरी त्यांनी राज्यात विरोधी पक्ष ठेवलेला नाही. सरकार बनविण्यासाठी महायुतीला शुभेच्छा देतो. लवकर सरकार स्थापन करून राज्यातील जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी प्राधान्य द्यावे." यावेळी जानकर यांनी ईव्हीएमवर खरपूस टीका केली. ते म्हणाले, ईव्हीएममुळे लोकशाही संपुष्टात येत आहे. याला विद्यमान सत्ताधारी जबाबदार आहेत. राष्ट्रीय समाज पक्ष ईव्हीएमच्या विरोधात देशभर आंदोलन करणार आहे. विरोधक जर या आंदोलनात सामील होणार असेल तर त्यांचेही आम्ही स्वागत करू.ईव्हीएम हॅक होऊ शकते का? या प्रश्नावर बोलताना महादेव जानकर यांनी आपल्या इंग्रजी बोलण्याच्या शैलीत या विषयावर भाष्य केले. "ईव्हीएम हॅक होते. आय एम अल्सो द इंजिनिअर. आय नो दॅट. विमान हॅक करता येते, सर्व काही हॅक करता येते. लोकशाही जिवंत ठेवायचे असेल तर त्यांनी मतपत्रिकेवर निवडणूक घ्यावी. आम्ही त्यांचे स्वागत करू." जानकर पुढे म्हणाले, सर्वोच्च न्यायालय, सर्व यंत्रणा, निवडणूक आयोग, माध्यमे अशा लोकशाहीच्या चारही स्तंभावर आज त्यांचे नियंत्रण आहे. त्यामुळे याला लोकशाही म्हणताच येणार नाही. ईव्हीएम बंद झालेच पाहीजे, अशी आमची मागणी राहणार आहे. विधानसभा निवडणुकीत वारेमाप पैशांचा वापर झाला. प्रत्येक गावात पैसे वाटले गेले. जर एका मतासाठी पाच-पाच हजार रुपये दिले जात असतील तर कसली लोकशाही आणि कसली विचारधारा.. आम्ही लोकांना आवाहन करत आहोत, विकल्या गेलेल्या समाजाचा नेताही विकला गेलेला असतो. उद्योगपतींनी निवडणुकीत अमाप पैसा वाटून लोकशाहीचा खून केला आहे. त्यामुळेच हा जो विजय झाला, तो विजय नसून विजयाची सूज आहे. एक दिवस जनताही याचा कडेलोट केल्याशिवाय राहणार नाही, अशी टीका महादेव जानकर यांनी केली.महादेव जानकर यांच्या राष्ट्रीय समाज पक्षाचे रत्नाकर गुट्टे हे परभणी जिल्ह्यातील गंगाखेड विधानसभेतून निवडून आले आहेत. त्यांनी महायुतीला उघडपणे पाठिंबा दिला आहे. गुट्टे यांनी जर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षासारखा भाजपाला पाठिंबा दिला तर ते पक्षावर दावा करतील का? असा प्रश्न महादेव जानकर यांना विचारण्यात आला. यावर महादेव जानकर मिश्किलपणे उत्तर देताना म्हणाले, गुट्टे असे काही करू शकणार नाहीत. मी पक्षाचा संस्थापक आणि राष्ट्रीय अध्यक्ष आहे. तांत्रिकदृष्ट्या सर्व चाव्या माझ्या हातात आहेत. शरद पवार राष्ट्रीय अध्यक्ष असले तरी त्यांनी सर्व तांत्रिक बाबी गर्जे यांच्याकडे दिल्या होत्या आणि गर्जेनी ते सर्व अजित पवारांना दिले. मी फार शहाणा आहे. मी पक्षाच्या सरचिटणीसांवरही विश्वास ठेवत नाही. सर्व सह्या मी स्वतः करतो. एबी फॉर्मवरही मीच सह्या करतो. शरद पवारांना असे केले नसेल. विधानसभा निवडणुकीच्या निकालावर बोलताना महादेव जानकर म्हणाले, "महायुतीसाठी निकाल चांगला लागला असला तरी त्यांनी राज्यात विरोधी पक्ष ठेवलेला नाही. सरकार बनविण्यासाठी महायुतीला शुभेच्छा देतो. लवकर सरकार स्थापन करून राज्यातील जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी प्राधान्य द्यावे." यावेळी जानकर यांनी ईव्हीएमवर खरपूस टीका केली. ते म्हणाले, ईव्हीएममुळे लोकशाही संपुष्टात येत आहे. याला विद्यमान सत्ताधारी जबाबदार आहेत.

---

# राज्यात १३ लाख अतिरिक्त मतदार?

## जितेंद्र आव्हाडांनी गणितच मांडलं; निवडणूक आयोगालाही सवाल!



### लोकशाही विश्वासावर अवलंबून

", हे स्पष्टीकरणही जितेंद्र आव्हाडांनी दिलं. "हा मतदार नोंदणीचा चमत्कार आहे की मतांमध्ये फेरफार आहे, हे तुम्हीच ठरवा. मतांमधील या विसंगती दोन गंभीर प्रश्न निर्माण करतात: १. मतं वाढवण्यासाठी ईव्हीएममध्ये छेडछाड केली का?, २. ECI चुकीचा किंवा फेरफार केलेला डेटा प्रकाशित करत आहे का? दोघांपैकी काही जरी झालं असेल, तरी हा प्रकार निवडणूक प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास कमी करतोय", असं जितेंद्र आव्हाड म्हणाले."निवडणूक आयोगाने स्पष्ट केले पाहिजे की १३ लाख अतिरिक्त मते का आहेत? – महाराष्ट्रात ६ महिन्यांत ४२ लाख मतदार कसे वाढले? – ईव्हीएमचे स्वतंत्र ऑडिट केले जात आहे का? लोकशाही ही लोकांच्या विश्वासावर अवलंबून असते.

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर विरोधकांनी ईव्हीएम घोटाळा झाल्याचा आरोप केला. तसंच, ते विजयी का ठरले याची सविस्तर माहितीच त्यांनी दिली होती. आता जितेंद्र आव्हाडांनी वाढलेल्या मतदारांचा मुद्दा उपस्थित केलाय. यावेळी त्यांनी वाढलेल्या मतदारांच्या घोटाळ्याचं गणितच एक्सवर मांडलंय.**

जितेंद्र आव्हाड म्हणाले, "महाराष्ट्राच्या निवडणुकीतील आकडेवारी जुळता जुळेना ! निवडणूक आयोगानुसार, महाराष्ट्रातील एकूण मतदार ९, ६४,८५,७६५ आहेत आणि यंदा मतदानाची टक्केवारी ६५.०२% होती. साधे गणित आह, ६५.०२ टक्के भागिले ९ ६४, ८५, ७६५ = ६, २७, ३५, ०४४.४ परंतु ECI ने ६,४०,८८,१९५ लोकांनी मतदान केल्याची नोंद केली आहे. यात अतिरिक्त १३ लाख ५३ हजार १५१ मते आहेत.""इतकेच नाही, तर ६५.०२ टक्के केल्यास त्यात ०.४ मतं असं गणित येतं. राज्यातच काय, संपूर्ण विश्वात अपूर्णांक मतं कशी असू शकतात?", असा सवालही जितेंद्र आव्हाडांनी उपस्थित केला.१३ लाख अतिरिक्त मते आली कुठून? आता मतदार नोंदणी पाहू. २०१९ ते २०२४ (५ वर्षे) महाराष्ट्रातील मतदारांची संख्या ५० लाखांनी वाढली, म्हणजे सरासरी प्रतिवर्षी १० लाख. पण २०२४ च्या सार्वत्रिक आणि विधानसभा निवडणुकांदरम्यान अवघ्या ६ महिन्यांत मतदारांची संख्या ४२ लाखांनी वाढली. ६ महिन्यांत ४२ लाख वाढ म्हणजे ८४ लाख/वर्षाचा वाढीचा दर, जो गेल्या ५ वर्षांतील सरासरी वार्षिक दराच्या ८.४ पट आहे.

# दिल्लीत अरविंद केजरीवालांवर हल्ला!

## अंगावर स्पिरीट फेकून जिवंत जाळण्याचा प्रयत्न

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्लीचे माजी मुख्यमंत्री व आम आदमी पार्टीचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांच्यावर हल्ला झाल्याची घटना पाहायला मिळाली आहे. पोलीस केजरीवालांना सुरक्षा पुरवण्यात अपयशी ठरले आहेत. दिल्लीतल्या मालवीय नगर परिसरात केजरीवाल यांची पदयात्रा चालू होती. त्याचवेळी एका इसमाने सुरक्षा व्यवस्था भेदून केजरीवालांच्या जवळ जात त्यांच्या अंगावर एका द्रव पदार्थाचा शिडकावला केला. दरम्यान, आम आदमी पार्टीने म्हटलं आहे की "त्या इसमाने केजरीवाल यांच्या अंगावर स्पिरिट (ज्वलनशील पदार्थ) फेकलं, त्याच्या हातात काडीपेटी देखील होती. अरविंद केजरीवाल यांना जिवंत जाळण्याचा त्या इसमाचा प्रयत्न होता". आम आदमी पार्टीचे प्रवक्ते व मंत्री सौरभ भारद्वाज यांनी पत्रकार परिषद घेऊन याबाबतची माहिती दिली आहे.**



केजरीवालांवरील हल्ल्याचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे.दरम्यान, पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतलं असून त्याची चौकशी सुरू केली आहे. या हल्ल्यानंतर सौरभ भरद्वाज यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी ते म्हणाले, "ग्रेटर कैलास विधानसभा मतदारसंघातील सावित्रीनगर परिसरात अरविंद केजरीवाल यांची पदयात्रा चालू होती. या पदयात्रेला हजारोंच्या संख्येने लोक जमले होते. यामध्ये महिला, वृद्ध, लहान मुलं व तरुणांची मोठी संख्या होती. केजरीवाल यांना पाहण्यासाठी, भेटण्यासाठी गल्लीबोळात लोक जमले होते.त्याचवेळी एका इसमाने केजरीवाल यांच्यावर हल्ला केला. मी स्वतः त्यावेळी केजरीवाल यांच्याबरोबर होतो. माझं जॅकेट देखील त्यावेळी भिजलं. त्या इसमाने केजरीवाल यांच्या अंगावर स्पिरिट फेकलं होतं. त्याने आमच्या अंगावर पाण्यासारखा द्रव पदार्थ फेकल्यानंतर मी व केजरीवालांनी वास घेऊन पाहिलं. आम्ही वासावरून ओळखलं की हे स्पिरिट होतं. त्या इसमाने केजरीवाल यांना जिवंत जाळण्याच्या प्रयत्न केला. त्याच्या एका हातात स्पिरिट तर दुसऱ्या हातात काडीपेटी होती. सौरभ भारद्वाज म्हणाले, "त्या इसमाने केजरीवाल यांना जिवंत जाळण्याचा प्रयत्न केला असला तरी आमचे कार्यकर्ते देखील खमके आहेत. त्यांनी लगेच त्या हल्लेखोराला पकडलं. तो आमच्या अंगावर स्पिरिट फेकू शकला मात्र काडीपेटी पेटवू शकला नाही. दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना आज भर रस्त्यात जिवंत पेटवण्याचा प्रयत्न झाला. ही खूप गंभीर बाब आहे. केजरीवाल यांनी पदयात्रा सुरू केल्यापासून त्यांना लोकांकडून मिळणारं समर्थन वाढतंय.त्यामुळे भारतीय जनता पार्टीची झोप उडाली आहे. त्यांचे नेते सैरभैर जाले आहेत. ते तिसऱ्यांदा दिल्लीत विधानसभा निवडणूक पराभूत होणार आहेत. सध्या त्यांची बिकट परिस्थिती दिसत आहे. त्यामुळेच ते लोक अशा कुरापती करत आहेत. केजरीवालांवर झालेला हा काही पहिला हल्ला नाही. यापूर्वी देखील असे अनेक प्रयत्न झाले आहे. मात्र, अशा हल्ल्याने केजरीवाल थांबणार नाहीत. ते आजवर थांबले नाहीत, घाबरले नाहीत. पुढेही थांबणार नाहीत. त्यांचा प्रवास चालूच राहील. ते लोकांची सेवा करत राहतील. भारद्वाज यांनी सांगितलं की "यापूर्वी विकासपुरीमध्ये देखील केजरीवाल यांच्यावर अशाच पद्धतीचा हल्ला झाला होता. तेव्हा देखील पोलीस केवळ बघ्याच्या भूमिकेत होते, हसत होते. पोलीस त्यावेळी त्या गुंडांसमोर हात जोडत होते. त्यानंतर काल बुराडीमध्ये देखील केजरीवाल यांच्यावर हल्ला झाला. आज त्यांच्यावर तिसरा हल्ला झाला. मात्र पोलीस त्यांच्या सुरक्षाव्यवस्थेकडे लक्ष देत नाहीत. केजरीवालांवरील हल्ल्याचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे.दरम्यान, पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतलं असून त्याची चौकशी सुरू केली आहे. या हल्ल्यानंतर सौरभ भरद्वाज यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी ते म्हणाले.

### केजरीवालांवर सलग तीन हल्ले

"ग्रेटर कैलास विधानसभा मतदारसंघातील सावित्रीनगर परिसरात अरविंद केजरीवाल यांची पदयात्रा चालू होती. या पदयात्रेला हजारोंच्या संख्येने लोक जमले होते. यामध्ये महिला, वृद्ध, लहान मुलं व तरुणांची मोठी संख्या होती. केजरीवाल यांना पाहण्यासाठी, भेटण्यासाठी गल्लीबोळात लोक जमले होते. त्याचवेळी एका इसमाने केजरीवाल यांच्यावर हल्ला केला. मी स्वतः त्यावेळी केजरीवाल यांच्याबरोबर होतो. माझं जॅकेट देखील त्यावेळी भिजलं. त्या इसमाने केजरीवाल यांच्या अंगावर स्पिरिट फेकलं होतं. त्याने आमच्या अंगावर पाण्यासारखा द्रव पदार्थ फेकल्यानंतर मी व केजरीवालांनी वास घेऊन पाहिलं. आम्ही वासावरून ओळखलं की हे स्पिरिट होतं. त्याच्या एका हातात स्पिरिट तर दुसऱ्या हातात काडीपेटी होती.सौरभ भारद्वाज म्हणाले.

# बांगलादेशी रुग्णांवर उपचार करणार नाही

## तिरंग्याचा अवमान; कोलकातामधील रुग्णालयाने घेतला निर्णय

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बांगलादेशमध्ये सत्तांतर झाल्यापासून हिंदू अल्पसंख्याकांवर अत्याचार होत आहेत. हिंदूबहुल असलेल्या भागांत हल्ले होणे, प्रार्थना स्थळांची विटंबना आणि धर्मगुरूंना अटक होण्याचे प्रकार आतापर्यंत घडले आहेत. मात्र आता बांगलादेशमध्ये भारतीय राष्ट्रध्वजाचा ठिकठिकाणी अवमान केला जात आहे.**



ही बातमी समोर आल्यानंतर पश्चिम बंगालच्या कोलकाता येथील जे.एन. रॉय रुग्णालयाने मोठा निर्णय घेतला आहे. बांगलादेशमधून येणाऱ्या रुग्णांवर यापुढे रुग्णालयात उपचार केले जाणार नाहीत, असे रुग्णालयाच्या संचालकांनी जाहीर केले आहे.जे. एन. रॉय रुग्णालयाचे संचालक सुभ्रांषू भक्त म्हणाले, "राष्ट्र सर्वात महत्त्वाचे आहे. राष्ट्रापेक्षा कुणीही मोठा नाही. वैद्यकीय सेवा देणे हा परोपकारी व्यवसाय असला तरी देशाची प्रतिष्ठा ही त्याउपर आहे. आम्ही जो निर्णय घेतला, तसाच निर्णय इतर रुग्णालयांनीही घ्यावा." भारतीय राष्ट्रध्वजाची विटंबना केल्याच्या निषेधार्थ रुग्णालयाने बांगलादेशमधील रुग्णांना सर्व प्रकारच्या वैद्यकीय सेवा नाकारण्याचा निर्णय घेतला आहे.आठवड्याच्या सुरुवातीला बांगलादेशात देशद्रोहाच्या आरोपाखाली हिंदू धर्मगुरू चिन्मय कृष्ण दास यांना अटक केली गेली. याप्रकरणी बांगलादेशने निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने सुनावणी घ्यावी, असे भारताकडून सांगण्यात आले. त्यानंतर बांगलादेशमध्ये ठिकठिकाणी भारतीय राष्ट्रध्वजाचा अवमान सुरू झाला.

### डॉक्टरही या भूमिकेला समर्थन देतील

भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनीही बांगलादेशमध्ये हिंदू आणि इतर अल्पसंख्याकांवर होणाऱ्या अत्याचारावरून चिंता व्यक्त केली आहे. प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ञ इंद्रनील साहा म्हणाले की, मी बांगलादेशी रुग्णांवर उपचार करणे बंद केले आहे. गुरुवारी रात्री साहा यांनी आपल्या सोशल मीडिया हँडलवर त्यामुळेच आता मी बांगलादेशी रुग्णांना उपचार देणे बंद करत आहे. राष्ट्र सर्वप्रथम, त्यानंतर माझे उत्पन्न. मला वाटते, इतर डॉक्टरही या भूमिकेला समर्थन देतील.

# प्रियांका चोप्राच्या आईच्या 'या' निर्णयामुळे वडील होते नाराज

सी गर्ल प्रियांका चोप्राने तिच्या अभिनयाचा डंका बॉलीवूडसह हॉलीवूडमध्ये गाजवला आहे. प्रियांकाने तिच्या अभिनयाच्या जोरावर मोठी प्रसिद्धी मिळवली आहे. तिच्या यशाचे आई मधु चोप्रा या नेहमी कौतुक करतात. त्या कायम मुलगी प्रियांकाचा त्यांना किती अभिमान आणि गर्व वाटतो याबद्दल सांगत असतात. असे असले तरी मधु चोप्रा यांच्या मनात एक खंत आहे. मुलीसाठी त्यांनी घेतलेल्या एका निर्णयामुळे आजही त्या अस्वस्थ असून काहीवेळा त्यांच्या डोळ्यात अश्रूही तरळतात, असं त्यांनी एका मुलाखतीमध्ये सांगितलं आहे. रॉड्रिगो कॅनेलसबरोबर 'समथिंग बिगर टॉक' शोमध्ये मधु चोप्रा यांनी मुलीच्या बालपणीची एक आठवण सांगितली आहे. त्यांनी सांगितलं, "माझी मुलगी फक्त सात वर्षांची होती, तेव्हा मी तिला बोर्डिंग स्कूलमध्ये पाठवलं होतं. तिच्या आयुष्यात ती फार पुढे जावी, तिने मोठी प्रगती करावी म्हणून त्यावेळी मी हा निर्णय घेतला होता. या निर्णयामुळे मी एक स्वार्थी आई ठरले का ते मला माहिती नाही. मात्र, या निर्णयासाठी माझ्या मनात खेद आणि अभिमान दोन्ही भावना आहेत. त्यावेळी प्रियांकाच्या मनाची अवस्था आठवून मला आजही रडू येते."मधु चोप्रा यांनी मुलाखतीमध्ये पुढे सांगितले, "प्रियांका आमची सर्वात लाडकी मुलगी आहे. ती आधीपासूनच फार हुशार आहे. तिच्या प्रगतीसाठी मी तिला लखनऊच्या 'ला मार्टिनियर स्कूल'मध्ये पाठवले होते.

# तेजस्विनी पंडित साकारतेय "स्वराज्य कनिका"

राष्ट्रमाता, राजमाता जिजाबाई शहाजीराजे भोसले... यांनी हिंदवी स्वराज्याची पायाभरणी करून या मुलुखाला छत्रपती शिवाजी महाराज दिले .बुद्धिमत्ता, चातुर्य, पराक्रम, शौर्य, दूरदृष्टी, कुशल राजनिती, कुटुंबवत्सल असे सगळेच गुण त्यांच्यात होते. शिवबाचे शिवराय घडवताना या माऊलीने अनेक वादळं पेलली. पण, या वादळात ही तेजस्वी ज्योत आणखी प्रखर झाली. प्रत्येक कसोटीवर खऱ्या उतरून या माऊलीने स्त्रीशक्ती व मातृशक्तिचे चिरंतन उदाहरण आपल्या सर्वांस दिले. जगाला दिशा देणाऱ्या या जगत्जननीच्या आयुष्यावर आधारित 'स्वराज्य कनिका जिजाऊ' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतेच 'स्वराज्य कनिका जिजाऊ' या चित्रपटाची घोषणा करण्यात आली असून या चित्रपटात जिजाऊंची भूमिका मराठी अभिनेत्री तेजस्विनी पंडित ( TEJASWINI PANDIT ) साकारणार आहे. या चित्रपटाचे पोस्टर झळकले असून राजमाता जिजाऊ यांची करारी मुद्रा यात दिसत आहे. चित्रपटाचे लेखन, दिग्दर्शन अनुजा देशपांडे या करत आहेत. दिग्दर्शिका अनुजा देशपांडे म्हणाल्या की, "राजा नंतर घडतो, आधी घडते ती राजमाताआहेतच पण त्याचबरोबर मराठी माणसाला त्याच्या अस्तित्वाची-सामर्थ्याची जाणीव करून देणारी एक शक्ती आहेत. हा अभिमान व जाणीव उराशी बाळगून वीरकन्या ते वीरमातेच्या जीवनकाळचे कथानक २-२.३० तासात मांडणे एक लेखिका म्हणून माझ्यासाठी आव्हानात्मक होते.

# महिलांची सर्वात मोठी चूक

दाक्षिणात्य सिनेसृष्टीसह बॉलीवूडमध्ये आपल्या अभिनयाने तमन्ना भाटियाने सार्यांनाच भुरळ पाडली आहे. तमन्ना कायम तिच्या कामामुळे चर्चेचा विषय ठरते. तसेच ती महिला सशक्तीकरणावरही परखडतेने स्वत:चे मत मांडते. नुकतेच तमन्नाने सिनेविश्वात महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलावा यावरही भाष्य केले आहे. तमन्नाने यासाठी महिलांनी आधी स्वत:चा दृष्टिकोन बदलणे किती गरजेचे आहे, हे सांगितले आहे.सध्या तमन्ना भाटिया 'सिकंदर का मुकद्दर' चित्रपटाच्या प्रमोशनच्या कामात व्यस्त आहे. अशात नुकतीच तिने यानिमित्त स्क्रीन लाइव्हला मुलाखत दिली. त्यावेळी सिनेविश्वात महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यासाठी तिने तिचे मत व्यक्त केले. तमन्ना म्हणाली की, "महिलांची सर्वात मोठी चूक म्हणजे त्या स्वत:ला एक महिला म्हणून संबोधित करतात. मात्र, त्यांनी स्वत:ची ओळख एक महिला म्हणून सांगण्याऐवजी एक व्यक्ती आणि मानव असल्याची सांगितली पाहिजे."स्त्री-पुरुष हा भेदभाव आपल्यापासूनच सुरू झाला आहे. महिलांनी त्यांची मानसिकता तशी करून घेतली आहे. महिलांनी ही मानसिकता बदलली पाहिजे. त्यांनी स्वत:ला पुरुषांच्या बरोबरीचे समजले पाहिजे. आपणच हा बदल स्वीकारला नाही तर अन्य व्यक्ती हा बदल कसे स्वीकारतील?", असे तमन्नाने यावेळी सांगितले आहे.



# रश्मिकाचा 'सुसेकी' गाण्यावर डान्स!

अल्लू अर्जुन आणि रश्मिका मंदाना यांच्या मुख्य भूमिका असलेला 'पुष्पा २' सिनेमा आता लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटाचा पहिला भाग २०२१ मध्ये प्रदर्शित झाला होता. तब्बल ३ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर प्रेक्षकांना, आता पुन्हा एकदा सिनेमागृहांमध्ये 'पुष्पाराज' अनुभवता येणार आहे. यासाठी ॲडव्हान्स बुकिंगला आजपासून ( ३० नोव्हेंबर ) सुरुवात होणार आहे.'पुष्पा'च्या पहिल्या भागाने बॉक्स ऑफिस कलेक्शनचे सर्व रेकॉर्ड्स मोडले होते. त्यामुळे आता या दुसऱ्या भागाकडून सुद्धा प्रेक्षकांना प्रचंड अपेक्षा आहेत. 'PUSHPA 2' चित्रपटाची सध्या सर्वत्र क्रेझ निर्माण झाली आहे. या चित्रपटामधलं "अंगारों का अंबर सा लगता है मेरा सामी" हे गाणं मे महिन्याच्या अखेरीस प्रदर्शित करण्यात आलं होतं. तेव्हापासून हे गाणं सोशल मीडियावर तुफान ट्रेंड होत आहे.'सुसेकी' गाणं प्रदर्शित झाल्यावर या गाण्याने सोशल मीडियावर सर्वत्र धुमाकूळ घातला होता. सामान्य लोकांपासून ते बॉलीवूड कलाकारांपर्यंत सगळ्यांना या गाण्याची भुरळ पडली होती. नेटकरी ट्रेंडनुसार रश्मिका अन् अल्लू अर्जुनसारख्या हुबेहूब हुकस्टेप करून लक्ष वेधून घेऊ लागले होते. आता खुद्द ऑनस्क्रीन 'पुष्पा' आणि 'श्रीवल्ली' या गाण्यावर थिरकले आहेत. 'पुष्पा २'च्या प्रमोशन इव्हेंटला अल्लू अर्जुन आणि रश्मिका यांनी 'सुसेकी' जबरदस्त डान्स केल्याचं पाहायला मिळालं. या दोघांच्या डान्सचे व्हिडीओ सर्वत्र व्हायरल होत आहेत. पुष्पा आणि श्रीवल्लीने काळ्या रंगाचे कपडे घालत या इव्हेंटला TWINNING केलं होतं. नेटकऱ्यांनी या व्हिडीओवर "पुष्पा आणि श्रीवल्ली फायर है", "मस्त जोडी", "हा चित्रपट ब्लॉकबस्टर होणार", "फ्लॉवर समजे क्या...", "या दोघांची केमिस्ट्री कमाल आहे" अशा कमेंट्स केल्या आहेत. दरम्यान, सुरुवातीला 'PUSHPA 2' २०२४ च्या ऑगस्ट महिन्यात प्रदर्शित होणार होता. पण, तांत्रिक बाबींमुळे या सिनेमाचं प्रदर्शन मेकर्सकडून पुढे ढकलण्यात आलं.

# कंगनाने आदित्य पंचोलीच्या मुलीची जागा घेतली

अभिनेता आदित्य पंचोली व अभिनेत्री झरीना वहाब यांचा मुलगा सूरज पंचोलीने २०१५ मध्ये आलेल्या 'हिरो' चित्रपटातून सिनेसृष्टीत पदार्पण केले. त्यांची मुलगी सना पंचोलीनेही २००० च्या दशकात चित्रपटांमध्ये येण्याचा प्रयत्न केला होता. विशेष म्हणजे सना २००५ मध्ये 'शाकालाका बूम बूम'मधून पदार्पण करणार होती, परंतु तिची जागा कंगना राणौतने घेतली. त्याचदरम्यान सनाचे वडील आदित्य आणि कंगना यांचे अफेअर सुरू होते. कंगनाने नंतर आदित्यवर शारीरिक आणि मानसिक छळ केल्याचा आरोप केला आणि मानहानीचा खटला दाखल केला. अलीकडेच एका मुलाखतीत सनाच्या आईला याबाबत विचारण्यात आलं. त्यावर सनाला अभिनेत्री व्हायचंच नव्हतं, असं ती म्हणाली. लेहेरन रेट्रोला दिलेल्या मुलाखतीत झरीना सनाबद्दल म्हणाली, "अभिनय तिला कधीच जमणार नव्हता." तिला कधीच अभिनेत्री व्हायचं नव्हतं. "कुटुंबीय काही वेळा मुलांना 'कर बेटा' म्हणत भाग पाडतात; पण ती म्हणायची, 'नाही आई, मला हे करायचं नाही'. ती स्लीव्हलेस टॉप किंवा शॉर्ट ड्रेस घालत नाही. तिला 'लो नेक' ड्रेस घालायला दिला होता, ती धावत परत आली आणि तिच्या खोलीतून बाहेरही आली नाही. मग त्यांनी दुसऱ्याला घेतलं, हे मुख्य कारण होतं. सना अजूनही असे कपडे घालत नाही," असं झरीना म्हणाली. सनाला अभिनेत्री व्हायचं नव्हतं आणि आम्ही याबाबत कधी गमतीतही बोलत नाही, असं तिने नमूद केलं.२०१३ मध्ये सना पांचोलीने हिंदुस्तान टाईम्सला एक मुलाखत दिली होती. तिथे तिने तिच्या आईने आता केलेल्या वक्तव्याच्या उलट सांगितलं सांगितलं. चित्रपट गमावल्याबद्दल कोणताही पश्चात्ताप नाही, असं तिने म्हटलं होतं. "शाकालाका बूम बूम संदर्भातील गोष्टी ठरल्याप्रमाणे घडल्या नाहीत. मात्र मला कसलाही पश्चाताप नाही", असं ती म्हणाली होती.सनाने लॉस एंजेलिसमध्ये अभिनयाचा कोर्सही केला होता, पण तिला खऱ्या व वास्तविक वाटणाऱ्या चित्रपटांमध्ये काम करायचे होते, असं तिने सांगितलं होतं. "मी एलएमध्ये अभिनयाचे शिक्षण घेतले आहे, पण मला डान्स करायचा नाही. मी डान्स चांगला करते, पण मला अशा प्रकारच्या चित्रपटांमध्ये रस नाही. मला वास्तववादी चित्रपट करायचे आहेत. मला बऱ्याच ऑफर मिळाल्या आहेत, पण मी स्वत:ला त्यात काम करताना पाहू शकत नाही," असं सना म्हणाली होती.'शाकालाका बूम बूम'चे दिग्दर्शक सुनील दर्शन यांनी या वर्षाच्या सुरुवातीला चित्रपटाच्या कास्टिंगदरम्यान काय घडलेलं, ते सांगितलं होतं. कंगना या भूमिकेसाठी जवळपास फायनल झाली होती, पण नंतर ती अचानक गायब झाली, त्यानंतर त्यांनी सनाला घेतलं.



# पाकिस्तानने इंडियाला केलं चीतपट!

## शाहजेब खानने साकारली शतकी खेळी

नवी दिल्ली | वृत्तसंस्था

**एकोणीस वर्षाखालील आशिया चषक २०२४ मध्ये, भारतीय क्रिकेट संघाला पहिल्याच सामन्यात पाकिस्तानविरुद्ध दारूण पराभवाला सामोरे जावे लागले आहे. दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात पाकिस्तान संघाने नाणेफेक जिंकून भारताला २८१ धावांचे लक्ष्य ठेवले होते, परंतु प्रत्युत्तरात भारतीय संघ ४७.१ षटकात २३७ धावांवरच गारज झाला. ज्यामुळे भारतीय संघावर सलामीच्या सामन्यातच कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानकडून ४४ धावांनी पराभूत होण्याची नामुष्की ओढवली.**



पाकिस्तानविरुद्धच्या या सामन्यात टीम इंडियाची फलंदाजी खूपच खराब झाली. लक्ष्याचा पाठलाग करताना निखिल कुमारशिवाय भारताचा अन्य कोणताही खेळाडू क्रीजवर टिकू शकला नाही. टीम इंडियासाठी निखिल कुमारने ७६ चेंडूत ६७ धावांची खेळी केली. या खेळीत त्याने ६ चौकार आणि ३ षटकारही मारले. निखिलशिवाय भारतीय संघाची संपूर्ण फलंदाजीच फ्लॉप ठरली. भारताविरुद्ध २८१ धावांचा बचाव करण्यासाठी आलेल्या पाकिस्तानी संघाची गोलंदाजी अतिशय उत्कृष्ट होती. पाकिस्तानकडून अली रझाने सामन्यात सर्वाधिक तीन बळी घेतले. याशिवाय अब्दुल सुभान आणि फहान उल हक यांनीही प्रत्येकी दोन गडी बाद केले. नावेद अहमद खान आणि उस्मान खान यांनीही प्रत्येकी एक गडी बाद केला.एकोणीस वर्षाखालील आशिया चषक स्पर्धेत भारताविरुद्धच्या सामन्यात पाकिस्तानचा फलंदाज शाहजेब खानने अप्रतिम कामगिरी केली. पाकिस्तानकडून शाहजेब खानने १५९ धावांची धमाकेदार शतकी खेळी केली. या डावात शाहजेबने पाकिस्तानसाठी १४७ चेंडूंचा सामना केला, ज्यामध्ये त्याने १० षटकार आणि ५ चौकारही मारले.

यासह शाहजेब एकोणीस वर्षाखालील क्रिकेटच्या एका डावात सर्वाधिक षटकार मारणारा पाकिस्तानचा फलंदाज ठरला आहे.शाहजेबशिवाय उस्मान खाननेही पाकिस्तानसाठी शानदार फलंदाजी केली. उस्मान खानने ९४ चेंडूत ६ चौकारांच्या मदतीने ६० धावांची खेळी केली. उस्मानसह शाहजेबनेही पहिल्या विकेटसाठी १६० धावांची उत्कृष्ट भागीदारी केली. यामुळेच पाकिस्तानी संघ भारताविरुद्ध फलंदाजी करताना २८१ धावा करू शकला. पाकिस्तानविरुद्धच्या या सामन्यात भारतीय संघाची गोलंदाजीही सामान्य होती. भारताकडून समर्थ नागराज हा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने १० षटकांच्या स्पेलमध्ये ४५ धावांत ३ बळी घेतले. याशिवाय आयुष महात्रेने २, तर किरण कोरमले आणि युद्ध जीत गुहा यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.पाकिस्तानविरुद्धच्या या सामन्यात टीम इंडियाची फलंदाजी खूपच खराब झाली. लक्ष्याचा पाठलाग करताना निखिल कुमारशिवाय भारताचा अन्य कोणताही खेळाडू क्रीजवर टिकू शकला नाही. टीम इंडियासाठी निखिल कुमारने ७६ चेंडूत ६७ धावांची खेळी केली. या खेळीत त्याने ६ चौकार आणि ३ षटकारही मारले. निखिलशिवाय भारतीय संघाची संपूर्ण फलंदाजीच फ्लॉप ठरली.

भारताविरुद्ध २८१ धावांचा बचाव करण्यासाठी आलेल्या पाकिस्तानी संघाची गोलंदाजी अतिशय उत्कृष्ट होती. पाकिस्तानकडून अली रझाने सामन्यात सर्वाधिक तीन बळी घेतले. याशिवाय अब्दुल सुभान आणि फहान उल हक यांनीही प्रत्येकी दोन गडी बाद केले. नावेद अहमद खान आणि उस्मान खान यांनीही प्रत्येकी एक गडी बाद केला.

एकोणीस वर्षाखालील आशिया चषक स्पर्धेत भारताविरुद्धच्या सामन्यात पाकिस्तानचा फलंदाज शाहजेब खानने अप्रतिम कामगिरी केली. पाकिस्तानकडून शाहजेब खानने १५९ धावांची धमाकेदार शतकी खेळी केली. या डावात शाहजेबने पाकिस्तानसाठी १४७ चेंडूंचा सामना केला, ज्यामध्ये त्याने १० षटकार आणि ५ चौकारही मारले.

### 160 धावांची उत्कृष्ट भागीदारी

शाहजेब एकोणीस वर्षाखालील क्रिकेटच्या एका डावात सर्वाधिक षटकार मारणारा पाकिस्तानचा फलंदाज ठरला आहे. शाहजेबशिवाय उस्मान खाननेही पाकिस्तानसाठी शानदार फलंदाजी केली. उस्मान खानने ९४ चेंडूत ६ चौकारांच्या मदतीने ६० धावांची खेळी केली. उस्मानसह शाहजेबनेही पहिल्या विकेटसाठी १६० धावांची उत्कृष्ट भागीदारी केली. यामुळेच पाकिस्तानी संघ भारताविरुद्ध फलंदाजी करताना २८१ धावा करू शकला. पाकिस्तानविरुद्धच्या या सामन्यात भारतीय संघाची गोलंदाजीही सामान्य होती. भारताकडून समर्थ नागराज हा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने १० षटकांच्या स्पेलमध्ये ४५ धावांत ३ बळी घेतले. याशिवाय आयुष महात्रेने २, तर किरण कोरमले आणि युद्ध जीत गुहा यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

# लबूशेनला प्लेइंग इलेव्हनमधून बाहेर करा

## फॉर्ममध्ये परत येण्यासाठीदेशांतर्गत क्रिकेट खेळले पाहिजे : जॉन्सन

नवी दिल्ली | वृत्तसंस्था

**भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील बॉर्डर गावस्कर ट्रॉफी मालिकेतील दुसरा सामना ६ डिसेंबर रोजी ॲडलेड येथे खेळला जाणार आहे. दोन्ही संघातील हा सामना पिंक बॉल कसोटी (डे-नाईट) सामना असणार आहे. या सामन्यापूर्वी ऑस्ट्रेलियाचा माजी वेगवान गोलंदाज मिचेल जॉन्सनने मोठं वक्तव्य केलं आहे. त्याच्या मते खराब फॉर्मशी झुंजत असलेल्या मार्नस लबूशेनला प्लेइंग इलेव्हनमधून वगळावे.**





पर्थ येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात लबूशेनने ५२ चेंडूत दोन धावा आणि दुसऱ्या डावात पाच चेंडूत तीन धावा केल्या होत्या. या सामन्यात ऑस्ट्रेलियाला २९५ धावांनी दारूण पराभवाला सामोरे जावे लागले होते. त्यामुळे मिचेल जॉन्सनच्या मते मार्नस लॅबुशेनला प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान देऊ नये.मिचेल जॉन्सनने 'नाईटली'मधील आपल्या कॉलममध्ये लिहिले आहे की, 'मार्नस लबूशेन बऱ्याच काळापासून धावा काढण्यासाठी संघर्ष करत आहे. दुसऱ्या कसोटी सामन्यात त्याच्या जागी दुसऱ्या खेळाडूला मैदानात उतरवायला हवे. याचा अर्थ पहिल्या कसोटी सामन्यातील दारुण पराभवासाठी कोणाला बळीचा बकरा बनवण्यात आला, असे नाही. त्याला कसोटी संघातून बाहेर केल्याने त्याला काही शेफिल्ड शिल्ड सामने आणि क्लब क्रिकेट खेळण्याची संधी मिळेल. तसेच देशासाठी खेळण्याचे त्याच्यावर कोणतेही दडपण नसेल.'मिचेल जॉन्सन पुढे म्हणाला, 'मला वाटते की जसप्रीत बुमराह आणि त्याच्या सहकारी गोलंदाजांचा सामना करण्याऐवजी देशांतर्गत क्रिकेट खेळल्याने लबूशेनला फायदा होईल.

### स्टीव्ह स्मिथचा फॉर्म हा चिंतेचा विषय

गेल्या १० कसोटी डावांमध्ये त्याने केवळ एकदाच दुहेरी आकडा गाठला आहे. त्याला क्रीजवर राहण्यासाठी संघर्ष करावा लागत असेल, पण सध्या असे करुन चालणार नाही.लबूशेनला वगळण्याचा अर्थ असा नाही की त्याचे कसोटी क्रिकेटमधील भवितव्य टांगणीला लागले आहे किंवा तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी तो योग्य खेळाडू नाही. स्टीव्ह स्मिथचा फॉर्म हा चिंतेचा विषय आहे.